# संक्षिप्त



जळगाव : महाराणा प्रताप शाळेत झालेल्या कार्यक्रमात बोलताना जीवन खिंवसरा. शेजारी उपस्थित मान्यवर.

## व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमास एम्को फाउंडेशनतर्फे सुरवात

जळगाव, ता. ५ : येथील महाराणा प्रताप विद्यालय व महापालिकेच्या तीन शाळांमध्ये एम्को फाउंडेशनतर्फे 'परिवर्तन' या व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचा प्रारंभ काल (ता. ४) झाला. महाराणा प्रताप संस्थेचे सचिव प्रा. जीवन खिंवसरा, महापालिका शिक्षण मंडळाचे सभापती विजय वाणी, उपायुक्त पठाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'परिवर्तन'या उपक्रमात गेल्यावर्षी सहभागी होऊन प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी अनुभव कथन केले. बोलण्याचे सामर्थ व धैर्य त्याबरोबरच जीवनाकडे सकारात्मकदृष्टीने पाहण्याची शिकवण या उपक्रमामधून मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी मनोगतात सांगितले. या प्रशिक्षण वर्गात विद्यार्थ्यांना ध्येयनिश्चीती, संवाद साधण्याची कला, सभाधीटपणा, कल्पनाशक्तीचा विकास आदी विषयांवर एम्को फाउंडेशनच्या प्रशिक्षित स्वयंसेवकांतर्फे मार्गदर्शन केले जाते. दहा महिने ३५ तासिकांमध्ये हा कार्यक्रम विभागला जातो. प्रा. खिंवसरा यांनी एम्को फाउंडेशनला धन्यवाद देऊन यापुढेही शाळेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहनही त्यांनी केले. शिक्षण सभापती वाणी यांनी महापालिकेच्या विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाची असलेली गरज ओळखून मदतीचा हात पुढे केल्याबद्दल एम्को फाउंडेशनला धन्यवाद दिले. उपायुक्त पठाण यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन या कार्यक्रमात मनापासून सहभागी होण्याचे आवाहन केले.